प्रकरण III

# अर्थसंकल्पीय व्यवस्थापन


# प्रकरण III:
# अर्थसंकल्पीय व्यवस्थापन

हे प्रकरण राज्य शासनाच्या वाटपाच्या प्राधान्य क्रमांचा आढावा घेते आणि अर्थसंकल्प तयार करण्यात पारदर्शकता आणि त्याच्या अंमलबजावणीची परिणामकारकता याची समीक्षा करते. तसेच निधीच्या विचलनाविना, धोरणात्मक पातळीवर घेतलेले निर्णय, प्रशासकीय स्तरावर अंमलात आणले गेले ह्याची समीक्षा करते. हे प्रकरण राज्याच्या विनियोजन लेखांच्या लेखापरीक्षणावर आधारित आहे.

## 3.1 अर्थसंकल्प प्रक्रिया

वार्षिक अर्थसंकल्प म्हणजे सार्वजनिक स्त्रोतांच्या कार्यक्षम वापरासाठी पथ नकाशाचे तपशीलवार वर्णन करणे. **परिशिष्ट 3.1** मध्ये अर्थसंकल्पाशी संबंधित शब्दावली दिलेली आहे. साधारणतः ऑगस्ट महिन्यांत अर्थसंकल्प परिपत्रक जारी करून अर्थसंकल्प प्रक्रियेचा प्रारंभ होतो, तसेच आगामी आर्थिक वर्षाकरिता विभागांना मार्गदर्शन देखील केल्याजाते. राज्यामधील अर्थसंकल्प तयारीची प्रक्रिया **आलेख 3.1** मध्ये दिलेली आहे.

**आलेख 3.1: राज्यामधील अर्थसंकल्प तयारीची प्रक्रिया**





महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका (प्रकरण IX) अनुसार विविध मंत्रालयांकडून अंदाजपत्रक प्राप्त करून वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्याची जबाबदारी वित्त विभागावर आहे.

विभागप्रमुखांच्या सल्ल्यानुसार नियंत्रण अधिकारी विभागीय जमा आणि खर्चाचे अदांजपत्रकतयार करतात आणि निर्धारित तिथीनुसारवित्त विभागाला प्रस्तुत करतात. वित्त विभाग अंदाजपत्रकाची छाननी करते आणि तपशीलवार अंदाजपत्रक ज्याला, 'अनुदानाकरिता मागणी' संबोधतात, तयार करते. अंदाजपत्रक तयार करतांना शक्यतो वास्तविकतेच्या समीप जाणे साध्य करणे हे उद्दिष्ट असले पाहिजे. अर्थसंकल्पीय प्रक्रियेमध्ये विनिर्दिष्ट आहे की विशिष्ट बाबींवरील खर्चाच्या अंदाजाची रक्कम ही वर्षामध्ये खर्च करू शकणाऱ्या रकमेएवढी असावी, ती जास्त नसावी किंवा कमी सुद्धा नसावी. अंदाजपत्रकातील बचत जितकी जास्त तितकी आर्थिक अनियमितता प्रस्थापित करते. जमेचे अंदाजपत्रक, विद्यमान कराचे दर, शुल्क इत्यादिवर आधारित असावे.

राज्य विधानमंडळाद्वारे अनुमोदित एकूण रक्कम ज्यात वर्ष 2021-22 दरम्यान मूळ आणि पूरक अंदाजपत्रक, खर्च आणि बचत अंतर्भूत आहे, **आलेख 3.2** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 3.2: 2021-22 करिता अंदाजपत्रक आणि खर्चाचा सारांश**




## 3.1.1 आर्थिक वर्षा दरम्यान एकूण तरतूद, प्रत्यक्ष संवितरण आणि बचतीचा सारांश

2021-22 दरम्यान, 297 अनुदान/विनियोजनाची एकूण अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि बचतीचा संक्षिप्त गोषवारा **तक्ता 3.1** मध्ये दिलेला आहे.

**तक्ता 3.1: आर्थिक वर्षादरम्यान अंदाजपत्रकीय तरतूद, संवितरण आणि बचती**

**(₹ कोटी मध्ये)**

| एकूण अंदाजपत्रकीय तरतूद | | संवितरण | | बचत | |
|---|---|---|---|---|---|
| दत्तमत | भारित | दत्तमत | भारित | दत्तमत | भारित |
| 463688.16 | 100698.54 | 370445.46 | 82405.21 | 93242.70 (20.11) | 18293.33 (18.17) |

स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे

कंसातील आकडे म्हणजे एकूण बजेट तरतुदीशी बचतीची टक्केवारी.

### 3.1.2 भारित आणि दत्तमत संवितरण

राजघटनेच्या कलम 112(2) नुसार वार्षिक आर्थिक विवरणात संविनिष्ट केलेल्या खर्चाचा अंदाज राज्याच्या संचित निधीवर आकारले जाणारे खर्च म्हणून विधानमंडळाने वर्णन केलेल्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम स्वतंत्रपणे दर्शविण्याची आवश्यकता आहे. राज्याच्या संचित निधीतून प्रस्तावित केलेल्या इतर खर्चाची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्च आणि महसुली खात्यावरील खर्च इतर खर्चापेक्षा वेगळा असेल.

मागील पाच वर्षातील (2017-18 ते 2021-22) एकूण भारित आणि दत्तमत संवितरण आणि बचतीचे कल विश्लेषण **तक्ता 3.2** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 3.2: 2017-18 ते 2021-22 दरम्यान संवितरण आणि बचत**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | संवितरण | | बचत | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दत्तमत | भारित | दत्तमत | टक्केवारी | भारित | टक्केवारी |
| 2017-18 | 240582.35 | 54606.42 | 76784.27 | 31.91 | 1060.84 | 1.94 |
| 2018-19 | 278697.33 | 64237.70 | 69773.31 | 25.03 | 4083.05 | 6.35 |
| 2019-20 | 328039.77 | 63443.42 | 101966.86 | 31.08 | 3726.33 | 5.87 |
| 2020-21 | 320694.58 | 96353.79 | 104429.48 | 32.56 | 2811.71 | 2.91 |
| 2021-22 | 370445.46 | 82405.21 | 93242.70 | 25.17 | 18293.33 | 22.20 |
| स्त्रोतः संबंधित वर्षाचे विनियोजन लेखे | | | | | | |

जास्त अंदाजामुळे, 25 ते 33 टक्क्यांपर्यंतची बचत हे कायमस्वरूपी वैशिष्टय आहे आणि मागील राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालांमध्ये त्यावर भाष्य करण्यात आले आहे.

## 3.2 विनियोजन लेखे

विनियोजन लेखे प्रत्येक आर्थिक वर्षासाठी सरकारच्या खर्चाची तुलना भारतीय संविधानाच्या कलम 204 आणि 205 अंतर्गत पारित केलेल्या विनियोजन कायद्याला जोडलेल्या अनुसूचित नमूद केल्यानुसार वेगवेगळ्या उद्देशांसाठी दत्तमत अनुदान आणि भारित विनियोजन रकमांशी करतात. विनियोजन लेखे स्थूल आधारावर असतात. हे लेखे मूळ अर्थसंकल्पीय तरतूद, पूरक अनुदाने, प्रत्यार्पण आणि पुनर्विनियोजन स्पष्टपणे चित्रित करतात तसेच विनियोजन अधिनियमांतर्गत प्राधिकृत अर्थसंकल्पाच्या भारित आणि दत्तमत बाबींच्या संदर्भात विविध विनिर्दिष्ट सेवांवरील प्रत्यक्ष भांडवली आणि महसुली खर्च दर्शवितात. अशाप्रकारे विनियोजन लेखे, निधीची उपयोगिता, अर्थाचे व्यवस्थापन आणि अर्थसंकल्पीय तरतुदींच्या संनियंत्रणाला सुकर करतात आणि म्हणून हे वित्त लेख्यांना संपूरक असतात.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक विनियोजनाची लेखापरीक्षा करतांना खात्री करतात की, प्रत्यक्षात विविध अनुदानांतर्गत झालेला खर्च हा त्या वर्षासाठी विनियोजन अधिनियमानुसार प्राधिकृत केलेल्या खर्चाच्या अनुषंगाने आहे आणि संविधानाच्या (कलम 202) प्रावधानांतर्गत आकारण्यात येणारा खर्च इतका आकारला गेला. तसेच, झालेला खर्च हा कायदे, संबंधित नियम, विनियमन आणि सूचना यांच्याशी सुसंगत आहे की नाही हे देखील तपासले जाते.

## 3.3 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या अखंडतेवर टिप्पण्या

### 3.3.1 अनावश्यक किंवा अधिकचे पूरक अनुदान

भारतीय संविधानाचे कलम 205 सह महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका परिच्छेद 169 आणि 170 पूरक अर्थसंकल्प किंवा पूरक अंदाजपत्रकालाकायदेशीर आधार देते. वर्ष 2021-22 दरम्यान, पूरक तरतूद (₹ 60,698.39 कोटी) मूळ तरतुदीच्या (₹ 5,03,688.31 कोटी) 12.05 टक्के इतकी होती.

**परिशिष्ट 3.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 35 प्रकरणांत (प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटी अथवा अधिक) प्राप्त केलेली एकूण ₹ 23,068.07 कोटी पूरक तरतूद अनावश्यक सिद्ध झाली कारण प्रत्यक्ष खर्च ₹ 1,80,531.15 कोटी हा मूळ तरतूद (₹ 2,22,880.01 कोटी) इतक्या स्तरापर्यंत पोहोचला नाही. ₹ 1,000 कोटी पेक्षा अधिक बचत झालेले अनुदान आणि जेथे पूरक तरतूद अनावश्यक सिद्ध झालेली आहे, **तक्ता 3.3** मध्ये दिलेले आहे.

**तक्ता 3.3: ₹ 1,000 कोटी पेक्षा अधिक बचत झालेले अनुदान आणि जेथे पूरक तरतूद अनावश्यक सिद्ध झाली**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनुदान क्र. आणि तपशील | मूळ तरतूद | पूरक तरतूद | खर्च | मूळ तरतुदीमधून बचत (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| **महसूल विभाग - दत्तमत** | | | | |
| W-02 सामान्य शिक्षण | 8856.76 | 40 | 7719.86 | 1136.9 (12.84) |
| D-03 कृषि सेवा | 9256.77 | 856 | 7989.63 | 1267.15 (13.69) |
| O-03 ग्रामीण रोजगार | 2900.79 | 100 | 1409.66 | 1491.13 (51.40) |
| F-02 शहरी विकास आणि इतर आगाऊ सेवा | 14147.46 | 578.69 | 11765.14 | 2382.32 (16.84) |
| Y-02 पाणी पुरवठा आणि स्वच्छता | 5389.98 | 3000 | 2107.66 | 3282.32 (60.90) |
| T-05 आदिवासी क्षेत्र विकास उपयोजनेवरील महसुली खर्च | 9850.06 | 1210.22 | 6311.68 | 3538.38 (35.92) |
| B-01 पोलिस प्रशासन | 21401.74 | 349.56 | 17639.87 | 3761.87 (17.58) |
| E-02 सामान्य शिक्षण | 60237.8 | 2888.19 | 56354.39 | 3883.41 (6.45) |
| L-03 ग्रामीण विकास कार्यक्रम | 11681.92 | 2327.77 | 7274.4 | 4407.52 (37.73) |
| **भांडवली विभाग** | | | | |
| H-08 सार्वजनिक बांधकाम प्रशासकीय आणि कार्यात्मक इमारतींवरील भांडवली खर्च | 3278.13 | 1260.89 | 1552.92 | 1725.21 (52.63) |
| I-05 सिंचनावरील भांडवली खर्च | 14334.34 | 367.37 | 11303.64 | 3030.71 (21.14) |
| O-10 ग्रामीण विकास कार्यक्रमावरील भाडंवली परिव्यय | 5733.45 | 673.33 | 1485.24 | 4248.21 (74.10) |
| स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे | | | | |

वरील प्रकरणांवरून असे सूचित होते की पूरक तरतूद अनावश्यक सिद्ध झाली कारण खर्च मूळ तरतुदीच्या बरोबरीने सुद्धा झाला नाही, जे स्पष्टपणे निधीचा चुकीचा अंदाज दर्शविते.

विभागांनी निधीच्या आवश्यकतेचा अंदाज बळकट करणे आणि पूरक तरतुदींच्या आधारे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. हे देखील सुनिश्चित केले पाहिजे की अपेक्षित बचत वेळेवर प्रत्यार्पित केली जाईल जेणेकरून निधी इतर विकासासाठी वापरता येईल.

### 3.3.2 आकस्मिकता निधीमधून अग्रिमे

राजघटनेच्या अनुच्छेद 267(2) आणि 283(2) च्या प्रावधानानुसार, बॉम्बे आकस्मिकता निधी अधिनियम 1956 अंतर्गत राज्याच्या आकस्मिकता निधीची स्थापना झाली होती. निधीमधून अग्रिमाचे प्रदान फक्त अकल्पित आणि तत्काल स्वरूपाच्या बाबींवर होणाऱ्या खर्चासाठी करावयास पाहिजे, ज्यांना विधानमंडळाच्या मंजुरी पर्यंत पुढे ढकलणे अवांछनीय राहील. हा निधी अग्रधन स्वरूपात असतो.

महाराष्ट्र आकस्मिक निधी अधिनियमानुसार राज्याच्या आकस्मिक निधीचा कॉर्पस ₹ 150 कोटी आहे. वर्ष 2021-22 दरम्यान, महाराष्ट्र शासनाने आकस्मिक निधीतून ₹ 21.00 कोटी काढले आणि 31 मार्च 2022 पर्यंत संपूर्ण रक्कम परत करण्यात आली.

2021-22 दरम्यान वित्त विभागाने जारी केलेल्या ₹ 21.00 कोटींच्या दोन मंजूर निधीमधून ₹ 21.00 कोटी रकमेची दोन आहरणे करण्यात आली. 2021-22 दरम्यान आकस्मिकता निधीमधून केलेल्या आहरणाचा तपशील **तक्ता 3.4** मध्ये दिलेला आहे.

**तक्ता 3.4: आकस्मिकता निधी मंजुरी आदेश आणि मंजुरीच्या तुलनेत उपयोगिता**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | मंजुरी संख्या आणि दिनांक | मुख्य शीर्ष/ अनुदान क्र. | आहरणाचे प्रयोजन | मंजुरी | खर्च | परतफेड |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CNF-2021/ C.R.2/बजेट–14 /15.09.2021 | 2235/A-05 | 1975 ते 1977 दरम्यान आणी बाणीच्या काळात संघर्षात सहभागी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत. | 16.00 | 16.00 | 16.00 |
| 2 | CNF-2021/ C.R.3/बजेट–5/ 09/12/2021 | 2225/ZG-03 | मनुष्यबळ पुरवण्यासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षणाशी संबंधित विशिष्ट कार्य पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाला तरतूद करण्यासाठी आकस्मिक निधी | 5.00 | 5.00 | 5.00 |
| | | | **एकूण** | **21.00** | **21.00** | **21.00** |

स्त्रोतः संबंधित विभागाचे आकस्मिकता निधी मंजुरी आदेश आणि कार्यालय महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई कडून प्राप्त माहिती

### 3.3.3 अत्याधिक अथवा अनावश्यक पुनर्विनियोजन

पुनर्विनियोजन म्हणजे अनुदानातंर्गत विनियोजनाच्या एका घटकाकडून, जेथे बचत अपेक्षित आहे, दुसऱ्या घटकाकडे जेथे अतिरिक्त निधीची गरज ओळखली जाते, निधीचे हस्तांतरण करणे. महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका, परिच्छेद 162 ते 164 अनुसार, वित्त विभाग आणि सचिवालयाचे प्रशासकीय विभाग, एका मुख्य शीर्ष, गौण शीर्ष अथवा उपशीर्षामधून पुनर्विनियोजन दुसऱ्या तशा शीर्षामध्ये परंतु समान अनुदान/विनियोजन, विनियोजन अधिनियमातंर्गत मंजूर करू शकतात.

बऱ्याचशा प्रकरणांत पुनर्विनियोजन अत्याधिक सिद्ध झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात बचत झाली. **परिशिष्ट 3.3** वरून निदर्शनास आले की आठ प्रकरणांत पुनर्विनियोजन अनावश्यक सिद्ध झाले, ज्यामुळे पुनर्विनियोजित रक्कमेची वरील प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटींची बचत झाली. वरील उदाहरणे ह्या वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत की, आवश्यकतांचे पर्याप्त निर्धारण अर्थसंकल्पीय नियंत्रक अधिकारी करू शकले नाही आणि पुनर्विनियोजनापूर्वी खर्चा संदर्भातील माहिती अद्यावत केली नाही.

### 3.3.4 अखर्चित रक्कम आणि प्रत्यार्पित विनियोजन आणि/अथवा मोठ्या प्रमाणात बचत/ प्रत्यार्पण


अंदाजित प्रस्ताव, खराब खर्च देखरेख यंत्रणा, योजनेची कमकुवत अंमलबजावणी क्षमता/ कमकुवत आंतरिक नियंत्रण ह्या बाबींवर आधारित अंदाजपत्रकीय वाटप हे आर्थिक वर्षाच्या अंताला निधी मुक्त करणे आणि मोठ्या प्रमाणात निधी बँकांमध्ये शासकीय खात्यांच्या बाहेर राखून ठेवण्याच्या विभागाच्या प्रवृत्तीला उद्‌धृत करतात. अधिकच्या बचतीमुळे, इतर विभाग जे त्या निधीचा उपयोग करू शकले असते, वंचित राहतात.

विनियोजन लेखांच्या लेखापरिक्षणात उघड झाले की 2021-22 दरम्यान ₹ 1,11,536.03 कोटींच्या निव्वळ बचतीपैकी ₹ 70,350.33 कोटींच्या (63.07 टक्के) 80 अनुदानांच्या बाबतीत प्रत्येक प्रकरणात एकूण तरतुदीच्या 20 टक्के अथवा अधिक होती जे **परिशिष्ट 3.4** मध्ये दर्शविले आहे. तसेच **परिशिष्ट 3.5** मध्ये दर्शविल्या प्रमाणे 69 अनुदानाच्या बाबतीत प्रत्येक प्रकरणांत ₹ 100 कोटींपेक्षा अधिक बचत होती.

महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका, परिच्छेद 173 विदित करते की, इतर शीर्षांच्या अंतर्गत संभाव्य अप्रत्याशित अधिकचे पुनर्विनियोजन करण्यासाठी अथवा पुढील वर्षाच्या अंदाजानुसार प्रदान करण्यात येणाऱ्या नवीन खर्चाची पूर्तता करण्यासाठी वितरण किंवा नियंत्रणअधिकाऱ्यांद्वारे बचत राखीव ठेवली जाऊ नये. संपूर्ण बचत ध्यानात आल्यावर तात्काळ प्रत्यार्पित केली जावी. ज्या तरतुदी फायदेशीररित्या उपयोगात येऊ शकणार नाही, प्रत्यार्पित करण्यात याव्या.

2021-22 मध्ये एकूण बचतीसह एकूण तरतुदीच्या वापराची टक्केवारी **आलेख 3.3** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 3.3: अनुदान-निहाय वापर आणि बचती**




(स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे)

वरील आलेखावरून असे दिसून येते की 297 अनुदानांपैकी केवळ 124 अनुदाने त्यांच्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदींच्या 90-100 टक्के वापर करू शकले, त्यामुळे ₹ 6502.74 कोटींची बचत झाली, तर 14 अनुदाने हे अर्थसंकल्पीय तरतुदींच्या केवळ 10 टक्केच वापर करू शकले.

ज्या विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात बचतीची नोंद झाली ते असे होते, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग (71 टक्के),सार्वजनिक बांधकाम विभाग (22 टक्के) आणि नियोजन विभाग (30 टक्के).

### 3.3.4.1 सतत बचत

सततची बचत निदर्शित करते की विभागाचे अर्थसंकल्पीय नियंत्रण प्रभावी नाही तसेच पुढील वर्षाकरिता निधीचे वाटप करते वेळी गत वर्षातील कल विचारात घेतले नाही. अनुदानांच्या चाचणी तपासणी दरम्यान लेखापरीक्षेस आढळून आले की गत पाच वर्षात 35 प्रकरणांमध्ये (**परिशिष्ट 3.6**) सातत्याने ₹100 कोटींपेक्षा अधिक बचत झाली होती, जे निदर्शित करते की एकतर अत्याधिक तरतूद करण्यात आली किंवा विधान मंडळाच्या आकांक्षाची अंमलबजावणी करण्यात यश आले नाही.

2017-18 ते 2021-22 मधील प्रत्येक आर्थिक वर्षातील अनुदान Q-03 'गृहनिर्माण' अंतर्गत एकूण तरतुदींच्या 51 टक्के आणि 98 टक्के आणि अनुदान O-10 'इतर ग्रामीण विकास कार्यक्रमांवरील भांडवली परिव्यय' अंतर्गत 75 टक्के आणि 89 टक्के एकूण बचत होती.

### 3.3.4.2 'निरंक' खर्चासह अनुदान

2021-22 दरम्यान खालील दोन अनुदानात ₹10 कोटींपेक्षा अधिक रकमेची ₹60.20 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद वर्षा अखेरीस अप्रयुक्त होती. **तक्ता 3.5** मध्ये तपशील दिलेला आहे.

**तक्ता 3.5: निरंक खर्चासह अनुदान**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | अनुदान | दत्तमत/ भारित | एकूण तरतूद | प्रत्यक्ष खर्च | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | B-03 वाहतूक प्रशासन | C | 50.00 | 0 | मार्च 2022 मध्ये ₹ 50 कोटींची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्याची विभागाने विशिष्ट कारणे दिली नाहीत. |
| 2 | W-08 इतर सामाजिक सेवांवरील भांडवली परिव्यय | V | 10.20 | 0 | केंद्र हिस्सा मुक्त न केल्यामुळे वर नमूद केलेल्या उपशीर्षांतर्गत संपूर्ण तरतूद ₹ 10.20 कोटी मार्च 2022 मध्ये प्रत्यार्पित केली. |
| | | **एकूण** | **60.20** | | |
| स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे | | | | | |

### 3.3.5 जास्तीचा खर्च आणि त्याचे नियमितीकरण

राजघटनेच्या अनुच्छेद 205 (1)(b) मध्ये विदित आहे की, आर्थिक वर्षादरम्यान कोणत्याही सेवेवर त्या सेवेसाठी, त्या वर्षी मंजूर केलेल्या रकमेपेक्षा अधिक खर्च झाला असेल तर राज्यपाल विधानमंडळा समक्ष त्या खर्चाची मागणी सादर करण्याची व्यवस्था करू शकतात. ह्याचा अर्थ असा आहे की आर्थिक वर्षाकरिता अनुदान/विनियोजनापेक्षा जास्तीचा केलेला खर्च राज्य विधानमंडळाद्वारे नियमित करणे राज्य शासनाला अनिवार्य आहे. जास्तीच्या खर्चाच्या नियमितीकरणाबाबत जरी कालमर्यादा निर्धारित केली नसली तरी, जास्तीच्या खर्चाचे नियमितीकरण हे लोकलेखा समिती मध्ये विनियोजन लेख्यांवर चर्चा पूर्ण झाल्यावर करावयास पाहिजे. असे करण्यात अयशस्वी होणे राजघटना अनुच्छेदाच्या तरतुदींचे उल्लंघन आहे आणि सार्वजनिक पैशाच्या वापराबद्दल कार्यकारिणीचे उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट विफल होते.

### 3.3.5.1 2021-22 वर्षाशी संबंधित जास्तीचा खर्च

वर्षभरासाठीच्या तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च हा केवळ विधानमंडळाच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करत नाही तर चुकीच्या नियोजनाचे ही निदर्शक आहे, जेविशिष्ट हेतुने केलेल्या अर्थसंकल्पासोबत खर्चाच्या प्रगतीचा मागोवा घेऊन टाळता येऊ शकतो. तसेच, अंदाजपत्रकीय प्राक्कलन ₹ 5,64,386.70 कोटीं पैकी, 297 अनुदान/ विनियोजनात 2021-22 दरम्यान ₹ 4,52,850.68 कोटींचा खर्च झाला. एकूण बचत ₹ 1,11,536.03 कोटी असली तरी 10 दत्तमत आणि दोन भारित अनुदान/विनियोजनात ₹ 486.35 कोटींचा जास्तीचा खर्च झाला ज्याचे भारतीय संविधानाच्या कलम 205 अंतर्गत नियमितीकरण करणे आवश्यक होते.

2021-22 दरम्यान, तरतुदींपेक्षा जास्त खर्चामुळे बंद झालेले अनुदान/विनियोजन, ज्यांचे नियमितीकरण करणे आवश्यक आहे, ते **तक्ता 3.6** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 3.6: 2021-22 दरम्यान तरतुदींपेक्षा जास्त खर्चामुळे बंद झालेले अनुदान/विनियोजन, ज्यांना नियमितीकरणाची आवश्यकता आहे**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | दत्तमत/भारित विनियोजनाचे नाव | एकूण अनुदान | खर्च | अधिक |
|---|---|---|---|---|
| | **दत्तमत अनुदान** | | | |
| 1 | C-05 इतर सामाजिक सेवा | 45.78 | 45.80 | 0.02 |
| 2 | G-06 निवृत्ती वेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभ | 37983.32 | 38450.71 | 467.39 |
| 3 | O-27 जिल्हा योजना, ठाणे | 116.99 | 117.01 | 0.02 |
| 4 | O-32 जिल्हा योजना, सोलापूर | 381.15 | 381.27 | 0.12 |
| 5 | O-38 जिल्हा योजना, धुळे | 166.64 | 166.65 | 0.01 |
| 6 | O-42 जिल्हा योजना, अहमदनगर | 438.20 | 438.35 | 0.15 |
| 7 | O-54 जिल्हा योजना, बीड | 273.35 | 276.04 | 2.68 |
| 8 | O-71 जिल्हा योजना, गडचिरोली | 50.43 | 51.42 | 0.99 |
| 9 | O-77 जिल्हा योजना, अकोला | 44.95 | 44.97 | 0.02 |
| 10 | O-82 जिल्हा योजना वाशिम | 150.77 | 150.91 | 0.14 |
| | **भारित विनियोजन** | | | |
| 11 | G-06 निवृत्ती वेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभ | 49.86 | 64.25 | 14.39 |
| 12 | ZA-02 सचिवालय आणि इतर सामाजिक सेवा | 0.14 | 0.56 | 0.42 |
| | **एकूण** | **39701.58** | **40187.94** | **486.35** |

स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे

अनुदान G 06 अंतर्गत अधिक खर्च हे मुख्यतः नवीन पेंशन प्रकरणे आणि चालू वर्षात कोविड-19 लॉकडाऊनमुळे स्थगित ठेवण्यात आलेली कौटुंबिक निवृत्ती वेतन प्रकरणे तसेच सुधारित करियर प्रगती योजना आणि वेतन पुनरीक्षण मिळाल्यामुळे पुनरीक्षण प्रकरणांची संख्या वाढल्यामुळे होते.

### 3.3.5.2 विगत आर्थिक वर्षातील जास्तीच्या खर्चाचे नियमितीकरण

वरील परिच्छेद 3.3.5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे जास्तीचा खर्च वाढीव कालावधीसाठी नियमित न केल्याने कार्यकारींवरील विधानमंडळाचे नियंत्रण सौम्य करते. राज घटनेच्या अनुच्छेद 205 नुसार अनुदान/विनियोजनापेक्षा जास्तीचा खर्च राज्य विधानमंडळाकडून नियमित करून घेणे राज्य शासनाला अनिवार्य आहे. जास्तीच्या खर्चाच्या नियमितीकरणाबाबत कालमर्यादा निर्धारित केली नसली तरी, जास्तीच्या खर्चाचे नियमितीकरण हे लोकलेखा समितीमध्ये विनियोजन लेख्यांवर चर्चा पूर्ण झाल्यावर करावयास पाहिजे. 32 अनुदाने आणि 13 विनियोजनांमध्ये वर्ष 2017-18, 2018-19, 2019-20 आणि 2020-21 दरम्यान जास्तीचा झालेला खर्च ₹ 2432.17 कोटी ज्यांचे मार्च 2022 पर्यंत नियमितीकरण प्रलंबित होते ते **परिशिष्ट 3.7** मध्ये तपशीलवार दर्शविले आहे.

## 3.3.6 भांडवली मालमत्तेच्या निर्मितीसाठी सहाय्यता अनुदान

एका सरकारकडून दुसऱ्या सरकारला, संस्थांना किंवा व्यक्तीला केलेले योगदानाच्या स्वरूपातील भुगतान म्हणजे सहाय्य अनुदान.

भारत सरकार लेखा मानक-2 (IGAS-2) नुसार अनुदानकर्त्याने (Grantor) अनुदानग्राहीला (Grantee) संवितरित केलेले सहाय्य अनुदान महसुली खर्च म्हणून वर्गीकृत आणि लेखांकित करावयास पाहिजे. 2017-18 ते 2021-22 करीता सहाय्य अनुदानाचे भांडवली खर्च म्हणून केलेले चुकीचे वर्गीकरण **तक्ता 3.7** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 3.7: सहाय्य अनुदानाचे भांडवली खर्च म्हणून झालेले चुकीचे वर्गीकरण**

**(₹ कोटी मध्ये)**

| | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| सहाय्य अनुदान भांडवली खर्च म्हणून बुक केले | 595.01 | 1311.26 | 1580.59 | 1423.66 | 1662.63 |
| एकूण खर्च | 269392.54 | 303615.89 | 338690.64 | 342638.31 | 398792.31 |
| भांडवली परिव्यय | 26842.18 | 35049.05 | 36415.57 | 29686.70 | 46670.39 |
| भांडवली परिव्यय मध्ये सहाय्यक अनुदानाचा हिस्सा टक्क्यामध्ये | 2.22 | 3.74 | 4.34 | 4.80 | 3.56 |
| सहाय्य अनुदानातीलखर्च महसुली खर्च मानलागेल्यास महसुली तूट (-)/महसुली आधिक्य (+)वर परिणाम | 595.01 | 1311.26 | 1580.59 | 1423.66 | 1662.63 |
| स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्त लेखे | | | | | |

## 3.4 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर टिप्पणी

### 3.4.1 एकमुश्त अर्थसंकल्पातील तरतूदी

महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका, परिशिष्ट X, परिच्छेद 53 आणि परिच्छेद 12 (e) नमूद करते कीमागील तीन वर्षांतील अंदाज आणि प्रत्यक्ष यांच्यातील तफावतीच्या संदर्भात अर्थसंकल्पीय तरतूद तपासली जावी आणि त्या आधारावर प्रस्तावित रक्कम कमी केली जावी. एकमुश्त हा नियम म्हणून अर्थसंकल्पीय अंदाज प्रस्तावित करू नये. 2021-22 करिता एकमुश्त अर्थसंकल्पीय तरतुदी **तक्ता 3.8** मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता 3.8: एकमुश्त अर्थसंकल्पीय तरतुदी**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | अनुदान क्र. आणि लेखा शीर्ष | तरतूद | खर्च | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | O10-(4515-800-01-01) अर्थसंकल्पात नसलेल्या भांडवली परिव्ययाकरिता एकमुश्त तरतूद (राज्य योजना) | 4243.09 | 0.00 | संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित/ पुनर्विनियोजित केली |
| 2 | G02-(2070-800-02-01) वेतन आणि भत्ते इ. करिता एकमुश्त तरतूद | 2500.00 | 0.00 | |

| अनु क्र. | अनुदान क्र. आणि लेखा शीर्ष | तरतूद | खर्च | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 3 | O04-(2515-800-01-01) अर्थसंकल्पात नसलेल्या महसुली परिव्ययाकरिता एकमुश्त तरतूद (राज्य योजना) | 100.00 | 0.00 | |
| 4 | T05-(2225-796-01-51) अर्थसंकल्पात नसलेल्या महसुली परिव्ययाकरिता एकमुश्त तरतूद | 41.76 | 0.00 | |
| 5 | N03-(2225-800-01-08) अर्थसंकल्पात नसलेल्या महसुली परिव्ययाकरिता एकमुश्त तरतूद | 2.90 | 0.00 | |
| स्त्रोतः2021-22 चे विनियोजन लेखे | | | | |

## 3.5 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या परिणामकारकतेवर टिप्पण्या

### 3.5.1 अर्थसंकल्प व प्रक्षेपण अपेक्षा आणि प्रत्यक्षातील दरी

अवास्तव प्रस्ताव, कमकुवत खर्च देखरेख यंत्रणा, कमकुवत योजनेची अंमलबजावणी करण्याची क्षमता/कमकुवत अंतर्गत नियंत्रणे ह्यावर आधारित अर्थसंकल्पीय वाटपामुळे विकासात्मक गरजांमध्ये निम्न इष्टतम वाटप होते. काही विभागांमध्ये बचतीचे आधिक्य हे इतर विभागांना निधीपासून वंचित ठेवते, ज्याचा उपयोग ते करू शकले असते.

2021-22 दरम्यान प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत अर्थसंकल्पीय (मूळ/पूरक) तरतुदींची संक्षिप्त स्थिती **तक्ता 3.9** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 3.9: प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत अर्थसंकल्पीय (मूळ/पूरक) तरतुदींची 2021-22 दरम्यानची संक्षिप्त स्थिती**

**(₹कोटी मध्ये)**

| | खर्चाचे स्वरूप | मूळ अनुदान/ विनियोजन | पूरक अनुदान/ विनियोजन | एकूण | प्रत्यक्ष खर्च | बचत (-) | बचत (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| दत्तमत | I महसूल | 338576.45 | 44205.02 | 382781.47 | 312093.71 | (-)70687.76 | 18.47 |
| | II भांडवल | 66283.91 | 10846.50 | 77130.41 | 55915.68 | (-)21214.73 | 27.50 |
| | III कर्जे आणि अग्रिमे | 3135.00 | 641.29 | 3776.29 | 2436.07 | (-)1340.22 | 35.49 |
| | **एकूण दत्तमत** | **407995.36** | **55692.81** | **463688.17** | **370445.46** | (-)**93242.71** | **20.10** |
| भारित | IV महसूल | 49503.58 | 42.53 | 49546.11 | 46353.87 | (-)3192.24 | 6.44 |
| | V भांडवल | 58.75 | 2.52 | 61.27 | 18.25 | (-)43.02 | 70.21 |
| | VI लोक ऋण | 46130.62 | 4960.53 | 51091.15 | 36033.09 | (-)15058.06 | 29.47 |
| | **एकूण भारित** | **95692.95** | **5005.58** | **100698.53** | **82405.21** | **(-)18293.32** | **18.16** |
| आकस्मिकता निधीमध्ये विनियोजन | | 0.00 | -- | 0.00 | 0.00 | -- | |
| | **एकूण बेरीज** | **503688.31** | **60698.39** | **564386.70** | **452850.67** | **(-)111536.03** | **19.76** |
| स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे | | | | | | | |

मागील वर्षीच्या (2020-21) 15.96 टक्क्यांच्या तुलनेत या वर्षादरम्यान मूळ तरतुदींच्या 12.05 टक्के, ₹ 60,698.39 कोटींची पूरक तरतूद केली होती.

कार्यालय प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी) I महाराष्ट्र कार्यालयाने आधिक्य व बचतीची माहिती खर्चावरील मासिक अहवालाद्वारे नियंत्रण अधिकाऱ्यांना नियमितपणे दिली होती. मार्च 2022 मध्ये प्राथमिक आणि अंतिम लेखे बंद झाल्यानंतर देखील त्यांनी संबंधित विभागांकडे ही बाब उचलून धरली होती आणि नियंत्रण अधिकाऱ्यांना लक्षणीय फरकाच्या कारणांच्या स्पष्टीकरणाबद्दल विनंती केली होती परंतु स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही (जून 2022).

2017-18 ते 2021-22 दरम्यान अर्थसंकल्पामधील एकूण तरतुदीच्या तुलनेत एकूण बचतीमधील कल **तक्ता 3.10** मध्ये दर्शविले आहेत.


**तक्ता 3.10: एकूण तरतुदीच्या तुलनेत एकूण बचतीमधील कल**

**(₹ कोटी मध्ये)**

| | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| मूळ अर्थसंकल्प | 309226.41 | 380734.44 | 431554.81 | 452136.69 | 503688.31 |
| पूरक अर्थसंकल्प | 63807.47 | 36056.94 | 65621.57 | 72152.87 | 60698.39 |
| **एकूण अर्थसंकल्प** | **373033.88** | **416791.38** | **497176.38** | **524289.56** | **564386.70** |
| प्रत्यक्ष खर्च | 295188.77 | 342935.03 | 391483.19 | 417048.36 | 452850.67 |
| बचत | 77845.11 | 70856.35 | 105693.19 | 107241.20 | 111536.03 |
| बचतीची टक्केवारी | 20.86 | 17.00 | 21.26 | 20.45 | 19.76 |
| स्त्रोतः संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे | | | | | |

विनियोजन लेख्यांमधील विचलनाच्या कारणांचा गोषवारा **आलेख 3.4** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 3.4: विनियोजन लेखा 2021-22 मधील विचलनाच्या कारणांचा गोषवारा**




(स्त्रोतः प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्राच्या व्हीएलसी अनुभागाकडून प्राप्त माहिती)

## 3.5.2 अर्थसंकल्पीय ओघ आणि अनुदानाचे पुनरावलोकन

### 3.5.2.1 खर्चाचा ओघ

शासन निधी संपूर्ण वर्षादरम्यान समान रितीने खर्च करावयास पाहिजे. आर्थिक वर्षाच्या शेवटी खर्चाचा ओघ म्हणजे आर्थिक औचित्याचे उल्लंघन आहे.

बॉम्बे वित्तीय नियम, 1959 अनुसार आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्चाचा ओघ करणे टाळावयास पाहिजे. नियमाच्या तरतुदीच्या विपरीत **परिशिष्ट 3.8** मधील यादीप्रमाणे 26 अनुदानांच्या बाबतीत असे निदर्शनास आले की ₹100 कोटी पेक्षा अधिकचा खर्च जो एकूण तरतुदींच्या 50 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त होता वर्ष 2021-22 च्या शेवटच्या तिमाहीमध्ये केला होता. वर्षाच्या शेवटी खर्चाची घाई करणे कमकुवत खर्च नियंत्रण दर्शविते. ह्या 26 प्रकरणात एकूण खर्च ₹ 34,107.78 कोटीं पैकी, ₹ 23,326.58 कोटींचा (68.39 टक्के) खर्च शेवटच्या तिमाहीमध्ये केला.

मार्च 2022 मध्ये 100 टक्के खर्च केलेल्या दोन मुख्य शीर्षांचा तपशील **तक्ता 3.11** मध्ये दिलेला आहे.


**तक्ता 3.11: मार्च 2022 मधील खर्चाचा ओघ**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | अनुदान संख्या | मुख्य शीर्ष | अनुदानाचा तपशील | वर्षादरम्यान एकूण खर्च | मार्च 2022 दरम्यान खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | E04 | 4202 | शिक्षण, क्रिडा कला आणि संस्कृती वरील भांडवली परिव्यय | 142.62 | 142.62 |
| 2 | O09 | 3604 | स्थानिक स्वराज्य आणि पंचायत राज संस्था यांना भरपाई आणि अभिहस्तांकन | 800.00 | 800.00 |
| स्त्रोतः प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र यांच्या व्हीएलसी अनुभागाकडून प्राप्त माहिती | | | | | |

2021-22 दरम्यान राज्याच्या राजकोषात मासिक जमेचा ओघ आणि वितरणे **आलेख 3.5** मध्ये दर्शविले आहेत.

**आलेख 3.5: 2021-22 दरम्यान मासिक जमा आणि खर्च**





(स्त्रोतः प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्राच्या व्हीएलसी अनुभागाकडून प्राप्त माहिती)

**आलेख 3.6** दर्शवितो की एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, नोव्हेंबर आणि जानेवारी दरम्यान झालेल्या खर्चाच्या तुलनेत जमा जास्त होती. तथापि, वर्षाच्या उर्वरित महिन्यांच्या तुलनेत मार्च 2022 दरम्यान जमा आणि खर्च मोठ्या प्रमाणात वाढला होता. तसेच, 2021-22 दरम्यान खर्चाच्या नमुन्याच्या छाननीत असे निदर्शनास आले की राज्य शासनाने केवळ

मार्च 2022 मध्ये ₹ 1,15,518 कोटी खर्च प्रस्थापित केला जो ₹ 4,52,851 कोटींच्या एकूण खर्चाच्या 25.51 टक्के होता.

**मार्च महिन्यातील खर्चाची उच्च टक्केवारी असलेले अनुदान 0-02 अंतर्गत मुख्य शीर्ष 2225 चा महिना-निहाय खर्च खाली आलेख 3.6 मध्ये दिलेला आहे.**

**आलेख 3.6: अनुदान O-02-मुख्य शीर्ष-2225 नियोजन विभागाचा महिना-निहाय खर्च**




| | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खर्च | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 15 | 0 | 5 | 0.15 | 275.11 |

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात झालेला प्रचंड खर्च विवेकपूर्ण आर्थिक व्यवस्थापनाशी विसंगत आहे आणि कमकुवत आंतरिक नियंत्रण प्रणाली आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण/ व्यवस्थापनाचा अभाव दर्शविते.

## 3.5.3 निवडक अनुदानाचे पुनर्विलोकन

महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका उपबंधित करते की, अनुदान प्रशासित करणाऱ्या प्राधिकाऱ्यांवर त्यांच्या नियंत्रणाखालील खर्चाच्या प्रगतीवर निरीक्षण ठेवण्याची तसेच खर्च मंजूर अनुदान किंवा विनियोजनातंर्गत राखण्याची जबाबदारी असते. अंदाज वेळेवर आणि अचूकपणे तयार करणे तसेच त्यांच्या ताब्यात असलेले अनुदान त्याच बाबींवर खर्च केले ज्यासाठी त्यांची तरतूद केली होती हे सुनिश्चित करणे आणि आवश्यकता नसल्यास बचत प्रत्यार्पित करणे ह्या बाबी प्राधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये अंतर्भूत असतात.

प्राधिकारी ह्या सूचनांचे कितपत पालन करत आहेत हे तपासण्याच्या दृष्टीने लेखापरीक्षेने 2019-20 ते 2021-22 ह्याकालावधीसाठी खालील अनुदानासाठी प्रशासकीय विभागाच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली.

- **अनुदान H-08 सार्वजनिक बांधकाम प्रशासकीय आणि कार्यात्मक इमारतीवरील भांडवली खर्च:** या अंतर्गत सार्वजनिक बांधकामावरील भांडवली परिव्यय, शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृतीवरील भांडवली परिव्यय, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय, नागरी विकासावरील भांडवली परिव्यय, अनुसूचित जाती व जमाती, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकाच्या कल्याणावरील भांडवली परिव्यय, सामाजिक सुरक्षा आणि कल्याणावरील भांडवली परिव्यय, इतर सामाजिक

सेवांवरील भांडवली परिव्यय ज्यामध्ये आठ मुख्य शीर्ष आहेत जसे की (4059) सार्वजनिक बांधकामावरील भांडवली परिव्यय, (4202) शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृतीवरील भांडवली परिव्यय, (4210) वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय, (4217) शहरी विकासावरील भांडवली परिव्यय, (4225) अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांच्या कल्याणावरील भांडवली परिव्यय, (4235) इतर सामाजिक सुरक्षा आणि कल्याणावरील भांडवली परिव्यय आणि (4250) इतर सामाजिक सेवांवर भांडवली परिव्यय (4405) मत्स्यव्यवसायावरील भांडवली परिव्यय यासाठी अनुदानाची तरतूद केली आहे.

- **अनुदान S-04 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय** यामध्ये मुख्य शीर्ष 4210 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील-भांडवली परिव्यय समाविष्ट आहे. या अंतर्गत अन्न व औषध प्रशासनाचे बळकटीकरण आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन योजना अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.
- **अनुदान U-04 पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण-** मुख्य शीर्ष 3435 पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण यांचा समावेश आहे. या अंतर्गत मुठा नदीचे प्रदूषण कमी करणे, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेसाठी, राज्य नदी संवर्धन योजना, आणि जलीय पर्यावरण संवर्धनासाठी राष्ट्रीय योजना (केंद्र पुरस्कृत योजना) अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.

### 3.5.3.1 अर्थसंकल्प आणि खर्च

2019-20 ते 2021-22 करीता अर्थसंकल्पीय तरतुदीची एकूण स्थिती, प्रत्यक्ष संवितरण आणि अनुदानाच्या अंतर्गत वर्ष बचती **तक्ता 3.12** मध्ये दिलेल्या आहेत.

**तक्ता 3.12: अनुदान क्र. H-08, S-04 आणि U-04 अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी आणि प्रत्यक्ष खर्चाचा तपशील**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | मूळ तरतूद | पूरक तरतूद | एकूण अनुदान अथवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **H-08– सार्वजनिक बांधकाम प्रशासकीय व कार्यात्मक इमारतीवरील भांडवली खर्च** | | | | | | |
| 2019-20 | 1862.74 | 73.68 | 1936.42 | 734.34 | 1202.08 | 62.07 |
| 2020-21 | 2436.32 | 118.13 | 2554.45 | 1149.54 | 1404.91 | 55.00 |
| 2021-22 | 3278.13 | 1260.89 | 4539.02 | 1552.92 | 2986.10 | 65..78 |
| **S-04 – वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय (दत्तमत)** | | | | | | |
| 2019-20 | 300.77 | 498.22 | 798.99 | 550.06 | 248.93 | 31.15 |
| 2020-21 | 17.65 | 0.00 | 17.65 | 8.78 | 8.87 | 50.25 |
| 2021-22 | 653.17 | 114.70 | 767.87 | 684.80 | 83.07 | 10.82 |
| **U-04–पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण (दत्तमत)** | | | | | | |
| 2019-20 | 240.30 | 0.00 | 240.30 | 9.82 | 230.48 | 95.91 |
| 2020-21 | 450.70 | 0.00 | 450.70 | 10.36 | 440.34 | 97.70 |
| 2021-22 | 466.45 | 0.00 | 466.45 | 49.42 | 417.03 | 89.41 |
| स्त्रोतः संबंधित वर्षाचे विनियोजन लेखे | | | | | | |

वरील तक्ता हे दर्शवितो की 2019-20 ते 2021-22 कालावधी दरम्यान अनुदान क्र. H-08 अंतर्गत 55 टक्के आणि 65.78 टक्के, अनुदान क्र. S-04 अंतर्गत 10.82 टक्के ते 50.25 टक्के आणि अनुदान क्र. U-04 अतंर्गत 89.41 टक्के ते 97.70 टक्क्या दरम्यान सतत बचत होती. अनुदान क्र. S-04 अंतर्गत प्रत्यार्पण मुख्यत्वे निधी जारी न करणे, कमी देयके प्राप्त होणे, उपकरणे खरेदी न करणे यामुळे होते. अनुदान U-04 अंतर्गत, भारत सरकारकडून निधी जारी न केल्यामुळे प्रत्यार्पण झाले.

महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिकेच्या परिच्छेद 170 मध्ये असे निर्दिष्ट केले आहे की पूरक विंनियोजनांसाठी प्रस्ताव सादर करताना खूप काळजी घेतली पाहिजे. अनुदान क्र H-08च्या संदर्भात पुरक मागणीचा प्रस्ताव देण्यापूर्वी अनुदानांतर्गत उपलब्ध निधीचे अयोग्य प्राक्कलन यामुळे 2019-20 ते 2021-22 या वर्षांत बचत झाली.

### 3.5.3.2 उप शीर्षांतर्गत भरीव बचत

2021-22 दरम्यान **तक्ता 3.13** मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुदान क्र. S-04 अंतर्गत दोन उपशीर्षांमध्ये आणि अनुदान क्र U-04 अंतर्गत पाच उपशीर्षांमध्ये ₹ 10 कोटीपेक्षा जास्त आणि एकूण तरतुदीच्या 50 टक्के ते 100 टक्क्यां दरम्यान बचत होती.

**तक्ता 3.13: अनुदान क्र.S-04 आणि U-04 अंतर्गत उपशीर्ष निहाय भरीव बचत**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | क्रॉस रेफरन्स कोड | तपशील | एकूण अनुदान | प्रत्यक्ष | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **S-04 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय (दत्तमत)** | | | | | | |
| 1 | 4210-105 (00)(42) | राज्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बळकटीकरण आणि श्रेणीवर्धन आणि नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे आणि पदव्युत्तर जागा वाढविणे (केंद्राचा वाटा 60%) | 24..44 | 0.44 | 24.00 | 98.20 |
| मार्च 2022 मध्ये ₹ 24.00 कोटींच्या तरतुदीचे प्रत्यार्पण योजनेंतर्गत झालेल्या वास्तविक खर्चावर आधारित होते. | | | | | | |
| 2 | 4210-105 (00)(44) | ॲलोपॅथीप्रमुख कामे | 10.00 | 0.00 | 10.00 | 100 |
| मार्च 2022 मध्ये ₹ 10.00 कोटींची संपूर्ण तरतूद निधी जारी न केल्यामुळे प्रत्यार्पित करण्यात आली. | | | | | | |
| **U-04 पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण** | | | | | | |
| 3 | 3435-103 (03)(01) | पुणे येथील मुळामुठा नदी जवळची लोकसंख्या कमी करण्याचा प्रकल्प (केंद्राचा हिस्सा) | 200.00 | 0.00 | 200.00 | 100 |
| मार्च 2022 मधील ₹ 200.00 कोटींची संपूर्ण तरतूद केंद्रीय हिश्याचे हप्तेवितरित न झाल्यामुळे प्रत्यार्पित करण्यात आली. | | | | | | |
| 4 | 3435-192 (01)(01) | राज्य नदी संवर्धन योजना. | 145.45 | 19.50 | 125.95 | 86.59 |
| मार्च 2022 मध्ये ₹ 125.95 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करणे हे सुधारित अंदाजानुसार झालेल्या वास्तविक खर्चावर आधारित होते. | | | | | | |
| 5 | 3435-103 (02)(13) | पर्यावरण जागरूकता, शिक्षण आणि हवामान बदल कृती योजना | 35.50 | 0.00 | 35.50 | 100 |

| अनु क्र. | क्रॉस रेफरन्स कोड | तपशील | एकूण अनुदान | प्रत्यक्ष | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| मार्च 2022 मध्ये ₹35.50 कोटींची संपूर्ण तरतूद हरितक्रांती योजनेतून प्राप्त झालेल्या 119 प्रस्तावांना मान्यता न मिळाल्यामुळे आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून निधीची मागणी न केल्यामुळे प्रत्यार्पित करण्यात आली. | | | | | | |
| 6 | 3435-103 (02)(07) | राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना | 60.00 | 29.92 | 30.08 | 50.13 |
| मार्च 2022 मध्ये ₹ 12 लाख निधीच्या मंजुरीसाठी शासन ठराव जारी केल्यानंतर बिल पोर्टलवर अर्थसंकल्प अधिकृतता स्लिप काढण्यासाठी तांत्रिक अडचणी आणि कोविड-19 महामारीमुळे योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण न केल्यामुळे मार्च 2022 मध्ये ₹ 30.08 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. | | | | | | |
| 7 | 3435-103 (04)(01) | जलीय पर्यावरण प्रणालीच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय योजना | 20.50 | 0.00 | 20.50 | 100 |
| केंद्र पुरस्कृत योजनेच्या निधीच्या वितरणासाठी केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या सुधारित प्रक्रियेनुसार निधी वितरणास मान्यता न मिळाल्यामुळे आणि धर्मवीर संभाजू तलाव,सोलापूरचे जतन करण्यासाठी केंद्र सरकारने जारी केलेली तरतूदवित्त विभागाद्वारे एकल नोडल एजन्सी खात्यातजमा न केल्यामुळे मार्च 2022 मध्ये ₹ 20.50 कोटी रुपयांच्या संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण करण्यात आले. | | | | | | |
| स्त्रोत : 2021-22 चे विनियोजन लेखे | | | | | | |

### 3.5.3.3 संपूर्ण तरतुदींचे प्रत्यार्पण

वर्ष 2021-22 च्या विनियोजन लेख्यांच्या छाननी दरम्यान उघड झाले की, अनुदान क्र. H-08 मधील चार उपशीर्षांतर्गत ₹ 165.48 कोटी, अनुदान क्र. S-04 मधील एक उपशीर्षांतर्गत ₹ 10 कोटी आणि अनुदान क्र.U-04 मधील तीन उपशीर्षांतर्गत ₹ 256.00 कोटींची संपूर्ण तरतूद मार्च 2022 मध्ये पुनर्विनियोजनाद्वारा **तक्ता 3.14** मध्ये दर्शविल्याप्रमाणे काढून घेतली/प्रत्यार्पित केली.

**तक्ता 3.14: अनुदान क्र. H-08, S-04 आणि U-04 अंतर्गत संपूर्ण तरतुदीच्या प्रत्यार्पणाचा तपशील**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | तपशील | मूळ आणि पूरक अनुदान | पुनर्विनियोजित रक्कम | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| **H-08 सार्वजनिक बांधकाम आणि प्रशासकीय आणि कार्यात्मक इमारतींवरील भांडवली खर्च** | | | | | |
| 1 | 4059 सार्वजनिक बांधकामावरील भांडवली परिव्यय. 051(25)(01) मुख्य कामे | 100.00 | 100.00 | 0.00 | 0.00 |
| 2 | 4059 सार्वजनिक बांधकामावरील भांडवली परिव्यय. 051(25)(02) आस्थापना शुल्क | 13.90 | 13.90 | 0.00 | 0.00 |
| 3 | 4210 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय<br>107(00)(05) अन्न व औषध प्रशासनाचे बळकटीकरण आणि अन्न व औषध चाचणी प्रयोगशाळांची आस्थापना | 26.58 | 26.58 | 0.00 | 0.00 |

| अनु क्र. | तपशील | मूळ आणि पूरक अनुदान | पुनर्विनियोजित रक्कम | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4059 सार्वजनिक बांधकामावरील भांडवली परिव्यय 051(27)(01) महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाला राज्यभरातील अध्यात्मिक स्थळांच्या जीर्णोद्धार आणि विकासासाठी मदत. | 25.00 | 25.00 | 0.00 | 0.00 |
| **S-04 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय** | | | | | |
| 5 | 4210 वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील भांडवली परिव्यय<br>105(00)(44) मुख्य कामे | 10.00 | 10.00 | 0.00 | 0.00 |
| **U-04 पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण** | | | | | |
| 6 | 3435 पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण 103(03)(01) पुणे येथील मुळामुठा नदी जवळची लोकसंख्या कमी करण्याचा प्रकल्प (केंद्राचा हिस्सा) | 200.00 | 200.00 | 0.00 | 0.00 |
| 7 | 3435 पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण 103(03)(13) पर्यावरण जागरूकता, शिक्षण आणि हवामान बदल कृती योजना. | 35.50 | 35.50 | 0.00 | 0.00 |
| 8 | 3435 पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण 103(04)(01) जलीय पर्यावरण प्रणालीच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय योजना | 20.50 | 20.50 | 0.00 | 0.00 |
| स्त्रोतः 2021-22 चे विनियोजन लेखे | | | | | |

अनुदान H-08 अंतर्गत उपशीर्षातील अनुदानांचे पुनर्विनियोजन कोविड-19 महामारीमुळे नविन कामे न घेतल्याने झाले. S-04 आणि U-04 अंतर्गत उपशीर्षातील अनुदानांचे पुनर्विनियोजन निधी जारी न करणे आणि केंद्र शासनाने जारी केलेली तरतूद जमा न केल्यामुळे पुनर्विनियोजन करण्यात आले.

## 3.6 निष्कर्ष

- एकूण तरतुदींपैकी 20 टक्के विनावापर राहिल्याने राज्य शासनाने राबवलेली अर्थसंकल्पीय प्रक्रिया अधिक वास्तववादी असण्याची गरज होती. वर्षाच्या दरम्यान झालेला एकूण खर्च मूळ अर्थसंकल्पापेक्षा आठ टक्के कमी होता आणि पूरक अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्पाच्या 16 टक्के होता.
- महसूल आणि भांडवली घटकांमध्ये चुकीच्या वर्गीकरणाची प्रकरणे होती.
- राजघटनेच्या अनुच्छेद 205 अंतर्गत वर्ष 2017-18 ते 2020-21 शी संबंधित 32 अनुदाने आणि 13 विनियोजनामध्ये अधिकचा झालेला खर्च ₹ 2432.17 कोटी नियमित करणे आवश्यक होते.
- मोठ्या प्रमाणात रक्कम अखर्चित राहिल्यामुळे पर्याप्त समर्थनाशिवाय पूरक अनुदान/ विनियोजन तसेच पुनर्विनियोजन प्राप्त झाले.

## 3.7 शिफारशी

(i) राज्य शासनाने विभागांच्या गरजांची विश्वासार्हता आणि वाटप केलेल्या संसाधनाचा शक्य तितक्या प्रमाणात उपयोग करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर आधारित वास्तववादी अर्थसंकल्प तयार करण्याची आवश्यकता आहे.

(ii) बचतीमधील घट सुनिश्चित करणे, अनुदान/विनियोजनातील मोठ्या प्रमाणावरील बचती टाळणे आणि अपेक्षित बचती ओळखून निर्धारित समयावधीत प्रत्यार्पित केली आहेत याची खात्री करण्यासाठी अर्थसंकल्पाची योग्य अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी सरकारने एक योग्य नियंत्रण यंत्रणा स्थापन करणे आवश्यक आहे.

(iii) अर्थसंकल्पीय तरतुदींपेक्षा अधिक खर्चाच्या नियमितीकरणासाठी प्रलंबित प्रकरणांना प्राधान्य दिले पाहिजे.